<u>नि. फौ. ख. क्र.२६८/२०२३</u> निशाणी ३१

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – सुवर्णा विजय बोंडे

वय – ४० वर्षे, व्यवसाय – घरकाम

पत्ता – रा. निमकर्दा, ता. बाळापूर, जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी निमकर्दा येथे माझे पती विजय श्रीधर बोंडे व माझा एक मुलगा व एक मुलगी यांच्या सोबत राहत आहे. तसेच माझी सासू कधी–कधी आमच्या येथे राहावयास येतात. दि.१०.०८.२०२३ रोजी माझ्या घरी होते. त्या दिवशी संध्या. ५.३० ते ५.४५ सुमारास मी व माझी सासू नामे रुखमाबाई श्रीधर बोंडे घरी होतो. त्यावेळी मी झाडून काढण्यासाठी घराच्या अंगणामध्ये आले. त्यावेळी आमच्या शेजारी राहणारे नामदेव देठे हे घराच्या बाहेरील ओट्याजवळ खोदकाम करीत होते. त्यांच्यासोबत त्यांची दोन मुले किसन देठे व रामदास देठे हे होते. त्यावेळी मी त्यांना विचारणा केली की, माझ्या ओट्याच्या येथे का खोदत आहात. त्यावेळी नामदेव देठे म्हणाले की, सरकारी जागा आहे. सदर ठिकाणी त्यांनी खोदले व ओट्याजवळ मोठ मोठे दगड आणून टाकत होते. मी त्यांना विचारणा केली असता किसन देठे व रामदास देठे यांनी मला घाण शिवीगाळ केली. तसेच किसन देठे हा दोन्ही हातामध्ये विटा घेवून मला मारण्याकरीता माझ्या ओट्यावर आला. त्यावेळी त्यांनी रामदास देठे व किसन देठे यांनी त्यांच्या घरातील बायकांना मला केस धरुन बाहेर ओढण्यास सांगितले. सदर आवाज ऐकून माझी सासूबाई घरातून बाहेर आली. त्यांनी त्या तिघांना काय झाले अशी विचारणा केली तसेच त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी किसन देठे याने तेथे पडलेले फावडे उचलले व माझ्या सासूबाई यांना मारले. ते फावडे माझ्या सासूबाईच्या उजव्या खांद्याला लागले त्यामुळे त्या खाली पडल्या. त्यांचा उजवा खांदा पुर्ण खाली घसरला होता व जखम झाली होती.

२. माझ्या पतीचा मामेभाऊ रितेश देठे व प्रशांत देठे हे त्या ठिकाणी आले. त्यानंतर मी व रितेश देठे माझ्या सासूबाईला डॉ. भागवत यांचेकडे वैद्यकीय उपचाराकरीता

ऑटोने घेवून गेले. तेथे डॉक्टरांनी एक्स–रे काढल्यानंतर माझ्या सासूबाईचा खांदा फ्रॅक्चर व क्रॅक असल्याचे त्यांनी सांगितले तसेच ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले. त्यानंतर मला घेण्यासाठी गौरव देठे त्या ठिकाणी आला. त्यानंतर आम्ही घरी आलो व सदर घटनेची फिर्याद देण्याकरीता उरळ पो.स्टे. येथे गेलो.

३. आता मला सदर फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३२** देण्यात येत आहे. आता मला छापील फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३३** देण्यात येत आहे. सदर घटनेची पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. ज्या फावड्याने माझ्या सासूला मारहाण केले होते ते दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला सफेद बॅन्डेजमध्ये गुंडाळलेले व त्यावर लाखेचे सिल असलेला मुद्देमाल फावडा न्यायालयात सादर करण्यात आला. तसेच त्यावर कागदी लेबल असून त्यावर दोन पंचांच्या सह्या असल्याचे दिसते. तसेच त्यावर भागवत हॉस्पीटल यांच्या शिक्काचे कागदी लेबल चिकटविल्याचे दिसते. सदर मुद्देमाल खुल्या न्यायालयात उघडण्यात आला. त्यामधून हिरव्या रंगाचा प्लॅस्टीक दांडा असलेला व पुढे लोखंडी पाते असलेले फावडे मिळून आले सदरचे फावडे हे तेच आहे. त्यास **आर्टीकल अ** देण्यात येत आहे.

४. सदर घटनेबाबत माझा न्यायालयामध्ये जबाब नोंद करण्यात आला होता. सदर जबाबामध्ये घडलेल्या घटनेबाबत मी सांगितले होते. आता मला सदरचा जबाब दाखविण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३४** देण्यात येत आहे. मी आरोपी नामदेव देठे, किसन देठे व रामदास देठे यांना पाहिल्यास ओळखू शकते. आरोपी क्र.१ ते ३ हे आज न्यायालयात हजर असल्याबाबत साक्षीदार यांनी ओळखले. मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले होते.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. मुन्ना खान यांचे मार्फत उलटतपासः</u>**

५. माझ्या कुटुंबाची व आरोपी क्र.१ ते ३ यांच्या कुटुंबाची सदर घटनेपुर्वी कोणताही वाद किंवा भांडण नव्हते. आरोपी व आमच्या कुटुंबाचे दिवाणी न्यायालयामध्ये

काही दावे दाखल होते अथवा नाही, याबाबत मला माहित नाही. प्रल्हाद नारायण देठे हे माझ्या सासूबाईचे वडील होते. शंकर व यमुनाबाई हे प्रल्हाद देठे यांचे बहिण भाऊ होते. प्रल्हाद यांच्या आईचे नाव मला माहित नाही. प्रल्हाद याच्या आईने ती हयात असताना मृत्युपत्राद्वारे काही शेती किसन यांना दिलेली होती, याबाबत मला माहित नाही. नि.दि.दा.क्र.२७/२००० हा आरोपी यांच्या कुटुंबामध्ये व आमच्या कुटुंबामध्ये चाललेला दिवाणी दावा होता, याबाबत मला माहित नाही.

६. सदर तथाकथित घटना घडली त्या दिवशी माझे पती शेतामध्ये गेले होते व ते आम्ही दवाखान्यात गेल्यानंतर फोन केल्यानंतर ते घरी आले. मी घटनास्थळी होते, त्यावेळी माझ्याकडे मोबाईल फोन होता. त्या दरम्यान मी माझ्या पतीला फोन करुन निरोप दिला नव्हता. सदर घटना घडल्यानंतर आम्ही लगेच ऑटो बोलाविला, तो ऑटो आमच्या गल्लीत असल्यामुळे लगेच आला व आम्ही तेथून सासूबाईला घेवून दवाखान्यात गेलो. आम्ही सासूबाईला घेवून उरळच्या दवाखान्यात गेलो नाही, आम्ही अकोला येथील दवाखान्यात गेलो. उरळ पो.स्टे. आमच्या गावातून ४ किमी इतक्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटना घडल्यानंतर दि.१०.०८.२०२३ रोजी मी, माझ्या पतीने किंवा रितेश याने उरळ पो.स्टे. येथे सदर घटनेची माहिती किंवा फिर्याद दिली नाही. सदर घटनेची माहिती गौरव यास देखील होती, त्यानी देखील पो.स्टे. ला सदर घटनेची माहिती दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दवाखान्यात गेल्यानंतर माझ्यासोबत रितेश होता त्यावेळी मी तेथील डॉक्टरांना घटनेची माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासूबाईला डॉक्टरांनी तपासल्यानंतर झालेल्या दुखापतीची माहिती डॉक्टरांनी मला दिली. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनेची प्रथम माहिती मी डॉक्टरांना दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी डॉक्टरांना दिलेल्या प्रथम माहितीमध्ये सांगितले होते की, माझी सासू घरामध्ये पाय घसरल्याने पडली व तिच्या खांद्याला दुखापत झाली. मी दि.११.०८.२०२३ रोजी दवाखान्यामध्ये गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, दि.११.०८.२०२३ रोजी माझ्या सासुबाईला दवाखान्यातून सोडल्यामुळे मी त्यांना घेवून घरी आले, मी दवाखान्यातून सासूबाईला घरी घेवून आले त्यावेळी संध्या. ६ ते ६.३० वाजले होते. हरीभाऊ हे माझ्या पतीचे मामा आहेत. मी पो.स्टे.ला आरोपींविरुध्द फिर्याद देण्याकरीता गेले त्यावेळी माझ्या

पतीचे मामा हरीभाऊ, माझे पती विजय, रितेश आणि प्रशांत यांच्या विरुध्द नामदेव यानी रिपोर्ट दाखल केला होता, हे म्हणणे खोटे आहे. मी पुन्हा सांगते की, मला त्याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे त्यांच्या घराचे बांधकाम करीत असताना हरीभाऊ, माझे पती विजय, रितेश व प्रशांत यांनी त्यांना कामामध्ये अडथळा निर्माण केला, शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली म्हणून आरोपी यांनी त्यांच्या विरुध्द दि.१०.०८.२०२३ रोजी उरळ पो.स्टे. येथे फिर्याद दाखल केली होती.

७. माझ्या घराच्या आजूबाजूला राहणाऱ्या लोकांना मी ओळखते. मी विनायक यादर, डिगांबर राऊत, अरुण जामोदे, निळू खेडकर आणि नितीन शर्मा यांना ओळखते ते त्यांच्या कुटुंबासह मी राहत असलेल्या व घटनास्थळाचा आजूबाजूला राहतात. सदर घटनेच्यावेळी गावातील इतर स्थानिक लोक हजर होते.

८. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गावातील श्रीमंत आहोत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे आमच्यापेक्षा छोटे असून गावामध्ये घर बांधत आहेत हे आम्हाला आवडत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावामध्ये पोलीस पाटील व सरपंच आहेत. त्यांना सदर घटनेची माहिती आम्ही दिलेली नव्हती. घटनेच्या वेळी माझ्याकडे व माझ्या पतीकडे मोबाईल होता.

९. मी माझा जबाब व रिपोर्ट पोलीसांना देतेवेळी " माझ्या ओट्याच्या येथे का खोदत आहात, तसेच मी त्यांना विचारणा केली असता किसन देठे व रामदास देठे यांनी मला घाण शिवीगाळ केली, तसेच रामदास देठे व किसन देठे यांनी त्यांच्या घरातील बायकांना मला केस धरुन बाहेर ओढण्यास सांगितले, तसेच त्यांनी (माझ्या सासूने) त्या तिघांना काय झाले अशी विचारणा केली, तसेच जखम झाली होती, तसेच त्यानंतर मला घेण्यासाठी गौरव देठे त्या ठिकाणी आला'' हा मजकूर सांगितला होता. सदरचा मजकूर हा माझ्या फिर्यादी जबाबात व बयानात का लिहीलेला नाही, याचे कारण मला सांगता येणार नाही.

१०. मी न्यायालयामध्ये माझा जबाब देण्याकरीता आले होते, त्यावेळी मला न्यायालयात येण्यासाठी कोणतेही समन्स दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणत्या न्यायालयामध्ये जायचे आहे, व काय बोलायचे आहे याची माहिती मला पोलीसांनी

दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटी फिर्यादी व जबाब दिला आहे. आर्टीकल अ कडील फावडे हे गावामध्ये बरेच लोकांकडे मिळून येतात, याबाबत मला माहित नाही. सदर फावडे हे माझ्यासमक्ष पोलीसांनी जप्त केले होते. सदर फावडे हे आरोपीच्या घरुन जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १०.१०.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.10.10 15:04:19 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १०/१०/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १०/१०/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १०/१०/२०२५ |